कृपया प्रसिद्धीसाठी दिनांक २-९-२०१७

# पुणे फेस्टिव्हलअंतर्गत महिला महोत्सवात

# पाककला व मेंहदी स्पर्धा संपन्न

२९ व्या पुणे फेस्टिव्हलमधे दरवर्षी प्रमाणे यंदाही महिला महोत्सवात पाककला आणि मेंहदी स्पर्धा आपटे रस्त्यावरील स्वप्नशिल्प हॉल येथे पार पडली. पाककला स्पर्धेत यंदा पुरुषांनाही भाग घेण्याची मुभा देण्यात आली त्यानुसार १० पुरुष स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत घरून करून आणायचे गोड आणि तिखट पदार्थ यांची स्पर्धा होती. गोड पदार्थांमध्ये पौष्टिक बर्फी आणि तिखट पदार्थांमध्ये 'हरभरा डाळीपासून बनवलेले तिखट पदार्थ' स्पर्धकांनी करून आणले होते. याचठिकाणी स्पर्धकांना 'खाऊची बाराखडी' या टीमतर्फे लाईव्ह डेमो देण्यात आला. यात अनेक पदार्थ महिलांना शिकायला मिळाले. या स्पर्धेत गोड पदार्थात ८० महिला व ३ पुरुषांनी तसेच तिखट पदार्थात १०० महिला व ७ पुरुषांनी भाग घेतला. या स्पर्धेसाठी वैशाली मालपाणी व सर्वेश जाधव यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेत दोन्ही गटात प्रत्येकी चार बक्षिसे दिली गेली. मदर रेसिपीचे मार्केटिंग प्रमुख अमित कुलकर्णी आणि पल्लवी स्पायसेसचे प्रसाद रसाळ यांच्या हस्ते विजेत्यांना विविध वस्तू व गिफ्ट व्हॉवचर्स देण्यात आले.

पाककला स्पर्धेच्या वेळीच मेंहदी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये ३० महिला स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यात 'नववधू' मेहंदी स्पर्धकांनी काढली. यातील प्रथम चार क्रमांकास बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेसाठी संगीता टाकळकर तरडे आणि विद्या खोत यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले त्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे मुख्य संयोजक कृष्णकांत कुदळे, मोहन टिल्लू, सुप्रिया ताम्हाणे, रचना पाटील, निशा डिंगरा, शामल मोहिते, तृप्ती सरोदे ,अशोक मेमजादे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मेघा केवटे व शितल कचरे यांनी केले आभार प्रदर्शन दिपाली पांढरे यांनी केले.

या सर्व स्पर्धेचे प्रायोजक मदर्स रेसिपी, पल्लवीज् स्पायसेस, डिवाईन लव्ह, एलिगन्स वेलनेस, कलाक्षेत्रम सिल्क अँड सारीज् व नॅचरल अनारकली हर्बल टी हे आहेत.

पुणे फेस्टिव्हल अंतर्गत होणाऱ्या महिला महोत्सव कार्यक्रमाच्या संयोजिका संयोगिता कुदळे व दीपाली पांढरे या आहेत.

कळावे.

**आपला स्नेहांकित**

संयोगिता कुदळे /दीपाली पांढरे प्रवीण प्र. वाळिंबे

९९२१०३०००१/९९२३०४०४४४ माध्यम समन्वयक

संयोजिका - महिला महोत्सव ९८२२४५४२३४